संत गाडगे बाबा
# अमरावती विद्यापीठ
ई - साप्ताहिक
## विद्यावार्ता
५ मे २०२३




Cover Page






- संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला ४० वर्ष पूर्ण
- विद्यापीठात महाराष्ट्र दिन व विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा ....
- उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार वितरण वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण

४० वर्षपूर्ती

# विशेषांक

# ई - साप्ताहिक विद्यावार्ता



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ


* मार्गदर्शक *

**प्रा. (डॉ.) प्रमोद येवले**

कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रा. (डॉ.) प्रसाद वाडेगांवकर**

प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

* प्रकाशक *

**डॉ. तुषार देशमुख**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

* संपादक *

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

* सहसंपादक *

**श्री. ओम जगताप**



विद्यावार्ता ई - पत्रिका उपलब्ध

https://www.sgbau.ac.in


## अनुक्रमणिका


- विद्यापीठात महाराष्ट्र दिन व विद्यापीठ वर्धापन दिन साजरा — १
- उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न
- ज्ञानदानाची प्रगतशील ४० वर्ष .... - डॉ. विलास नांदुरकर — २
- शैक्षणिक विभाग प्रमुखांची होणार रोटेशन पद्धतीने निवड — ११
- उच्च शिक्षण संस्था प्रणालीसाठी मूल्यांकन आणि मान्यता यावर हॅन्डहोल्डींग सेशन संपन्न — १२
- विद्यापीठाचा कर्तव्यपूर्ती सोहळा संपन्न — १४
- विद्यापीठात वल्ड आय. पी. आर. डे. उत्साहात साजरा — १६
- विद्यार्थ्यांचा उरळी कांचन येथे अभ्यास दौरा — १७
- गणित विभागात राष्ट्रीय गणित दिन साजरा — १८
- पंचमहाभूतांचे संतुलन आपल्या हातात - डॉ. भारतभूषण शर्मा — १९
- विद्यार्थी शिक्षकांची फिजिओ क्लिनिकला भेट — २०
- जयंती विशेष — २१
- बातमी कात्रणे — २२




# कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचे हस्ते ध्वजारोहण





**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा स्थापना दिन, महाराष्ट्र दिन आणि आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून विद्यापीठामध्ये १ मे रोजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचे शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, तर प्रांगणात सर्व प्रशासकीय व शैक्षणिक विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी यावेळी शुभेच्छपर मनोगत व्यक्त केले. संचालन क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी केले.









उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा वितरण समारंभाला उपस्थित मान्यवर

# विद्यापीठात कुलगुरूंचे हस्ते उत्कृष्टसेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न



## विद्यापीठ स्थापनेला चाळीस वर्षे पूर्ण

### गुणवत्तेचे आव्हान स्वीकारा - कुलगुरू डॉ. प्रमोद येवले

काम करण्याची स्फूर्ती मिळावी, कौतुकाची थाप पडावी, या उद्देशाने हा पुरस्कार महत्वाचा आहे. वार्षिकांकामध्ये महाविद्यालयाची प्रगती, सामाजिक घटना, बदल याचे प्रतिबिंब दिसून येते. विद्यापीठाला चाळीस वर्षे पूर्ण झाली आहेत. हा फारसा मोठा काळ नसून तुलनेने आपण खूप प्रगती केली आहे.

**जागतिकीकरणानंतर खूप बदल झाले आहे, प्रवाहासोबत आपण चाललो पाहिजे. खाजगी व विदेशी विद्यापीठांशी आपली स्पर्धा आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता गुणवत्तेमध्ये आपण कुठेही कमी पडता कामा नये. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याकरीता गुणवत्तेचे आव्हान सर्वांनी स्वीकारावे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी केले.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा स्थापना दिन, महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाचे औचित्य साधून उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार २०२३ व वार्षिकांक स्पर्धा २०२१-२२ चे पुरस्कार कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एस.व्ही. डुडूल, आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ.सौ.व्ही.पी. गुडधे व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.





**उत्कृष्ट** सेवा गौरव पुरस्कारांतर्गत शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र व रौप्यपदक देवून कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील संवर्गात कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हाचे प्राचार्य डॉ. अरविंद देशमुख व भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या प्राचार्य डॉ. आराधना वैद्य यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीचे डॉ. गजानन वाघ व शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोलाच्या डॉ. प्रियाकुमारी खिल्लारे यांचा, विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांचा, विद्यापीठ प्रथम श्रेणी अधिकारी संवर्गात सहा. कुलसचिव (नामांकन) श्री राहुल नरवाडे व उपकुलसचिव (विकास) डॉ. सुलभा पाटील, विद्यापीठ द्वितीय श्रेणी अधिकारी संवर्गात गोपनीय विभागाचे अधीक्षक श्री माधव कविश्वर यांचा, विद्यापीठ तृतीय श्रेणी कर्मचारी संवर्गात अभियांत्रिकी विभागातील कनिष्ठ अभियंता श्री संजय धाकुलकर व आस्थापना विभागातील वरीष्ठ सहाय्यक सौ. अनुराधा खडसे यांचा, विद्यापीठ चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत सारणी विभागातील शिपाई श्री विलास परचाके व रासायनिक तंत्रशास्त्र विभागातील प्रयोगशाळा परिचर कु. नेहा बोंडे यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरावरील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजार येथील वरीष्ठ लिपीक श्री नितीन तसरे व श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या प्रयोगशाळा सहाय्यक डॉ. वैशाली देशमुख यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी स्व. भाष्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान आणि आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखरखेर्डा, जि. बुलढाणाच्या ''ई-चावडी'' या वार्षिकांकाकरीता महाविद्यालयाला रु. ५००१/- रोख पारितोषिक व गौरव प्रमाणपत्र देवून सत्कार केला.

वार्षिकांक स्पर्धेत शहरी विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक भारतीय महाविद्यालय, अमरावतीच्या 'भारती' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक विद्याभारती महाविद्यालय, अमरावतीच्या 'प्रतिभा' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसदच्या 'कल्पना' या वार्षिकांकास, तर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक सिपना अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, अमरावतीच्या 'इन्नोव्हेटर २०२२' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेराच्या 'टेक्नोस्ट्रीम २०२२' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावतीच्या 'टेक्नोरिदम २०२२' या वार्षिकांकास तसेच ग्रामीण विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक इंदिरा महाविद्यालय, कळंबच्या 'कदंबिनी' या वार्षिकांकास, द्वितीय क्रमांक गो.सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुरबाजारच्या 'फुलोर' या वार्षिकांकास व तृतीय क्रमांक कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हाच्या 'आरोह' या वार्षिकांकास, तर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, अमरावतीच्या 'पोटेन्शिअल २०२२' या वार्षिकांकास कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचे शुभहस्ते स्मृतिचिन्ह व गौरव प्रमाणपत्र देवून महाविद्यालयांना सन्मानित करण्यात आले.







**मार्गदर्शन** करतांना कुलगुरू म्हणाले, काम करण्याची स्फूर्ती मिळावी, कौतुकाची थाप पडावी, या उद्देशाने हा पुरस्कार महत्वाचा आहे. वार्षिकांकामध्ये महाविद्यालयाची प्रगती, सामाजिक घटना, बदल याचे प्रतिबिंब दिसून येते. विद्यापीठाला चाळीस वर्षे पूर्ण झाली आहेत. हा फारसा मोठा काळ नसून तुलनेने आपण खूप प्रगती केली आहे. विद्यापीठ स्थापनेचा मी साक्षीदार आहे. चार ''ई'' शैक्षणिक क्षेत्रामध्ये महत्वाच्या आहेत. एक्सपान्शन शिक्षणाचे खूप होत आहे. पण त्या तुलनेने एक्सलन्स म्हणजे गुणवत्तेमध्ये आपण मागे आहोत. गुणवत्तेबाबत तडजोड करुन चालणार नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थी यामध्ये कमी पडतो आहे, त्याचा सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे. एकूणच आपल्या विद्यापीठातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीचे आव्हान प्रत्येकाने स्वीकारले पाहिजे.

इक्वॅलिटी (समानता) - आज प्रत्येकाला समान शिक्षणाची संधी मिळत आहे, ही चांगली बाब आहे. एम्प्लॉयमेन्टच्या बाबतीत ते म्हणाले, आजचं शिक्षण नोकरीच्या दृष्टीने केल्या जाते. ज्ञानार्जनाच्यादृष्टीने त्यामध्ये कमतरता दिसते. विद्यार्थी स्वतःच्या पायावर कसा उभा राहील, स्कील मनुष्यबळ कसे तयार होईल आणि रोजगाराभिमुख शिक्षण त्याला कसे देता येईल, यासाठी प्रयत्न व आव्हाने प्रत्येकाने स्वीकारण्याची गरज आहे. जागतिक स्तरावर विद्यापीठाची स्पर्धा आहे. नवीन शैक्षणिक धोरण भारतात लागू झाले आहे. त्यातील बदल आपण स्वीकारला पाहिजे, त्याची अंमलबजावणी सुद्धा आपल्याला करावयाची आहे. नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांसाठी फार महत्वाचे आहे. त्याकरीता नवीन शैक्षणिक धोरणाची माहिती जास्तीतजास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी, अशा सूचना देखील त्यांनी याप्रसंगी केल्यात.

विद्यार्थ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने रोडमॅप आखण्याची आवश्यकता असून विद्यार्थ्यांना प्रमोट कसे करता येईल, तसेच विद्यापीठ सेंटर ऑफ इन्नोव्हेशन असून त्याही दृष्टीने अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. व्यवस्थापन परिषदेने काही महत्वपूर्ण निर्णय घेतले आहेत, त्या निर्णयाची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. भविष्यात जास्तीतजास्त स्वायत्त संस्थांची संख्या वाढीची आवश्यकता असून त्यादृष्टीने पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठाची आर्थिकस्थिती कशी चांगली करता येईल, याकरीता प्रयत्न करणार असल्याचेही सांगून त्यांनी महाराष्ट्र दिन, आंतरराष्ट्रीय कामगार दिन व विद्यापीठ वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्यात.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने झाली. कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन मान्यवरांचे हस्ते करण्यात आले. अधिष्ठाता डॉ.एस.व्ही. डुडूल, डॉ.सौ.व्ही.पी. गुडधे व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी पुरस्कारकर्त्यांचा परिचय करुन दिला. संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध प्राधिकारिणींचे सदस्य, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्राप्त मानकरी**




शहरी विभागात वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक विजेते




ग्रामीण विभागात वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक विजेते






# संत गाडगे बाबा विद्यापीठाच्या ज्ञानदानाची प्रगतीशील ४० वर्षे

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला १ मे, २०२३ रोजी स्थापन होऊन चाळीस वर्ष पूर्ण होत आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा त्यानंतर कालांतराने अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन वाशिम जिल्ह्याची निर्मिती झाली व अमरावती विद्यापीठाचे परिक्षेत्र पाच जिल्ह्यांचे झाले. या जिल्ह्यांकरीता १ मे, १९८३ रोजी अमरावती येथे विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाने केली. तत्कालीन विदर्भ महाविद्यालयामध्ये हे विद्यापीठ सुरु झाले. तपोवन शेजारी ४७० एकराच्या भव्य परिसरात विद्यापीठरूपी वटवृक्ष आज डोलदारपणे उभा असून महाराष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठांचा विचार करता अमरावती विद्यापीठाने केलेली प्रगती खरोखरच वाख्याणण्याजोगी आहे. विद्यापीठाच्या ज्ञानदानाच्या प्रगतीशील ४० वर्षाच्या कार्याचा छोटासा आलेख.





चाळीस वर्षापूर्वी लावलेल्या छोट्याश्या रोपट्याची आज वटवृक्षाकडे प्रगतशील वाटचाल सुरु आहे.

अमरावतीला विद्यापीठ व्हावे, यासाठी पहिला प्रशासकीय ठराव ७ ऑगस्ट, १९६४ ला विधानसभेत मांडल्या गेला. तेव्हापासून चळवळ सुरु झाली. सतत वीस वर्ष अमरावती विद्यापीठाच्या निमित्तीचा प्रयत्न या भागातील जनप्रतिनिधींनी पोटतिडकीने सांसदीय आयुधांचा वापर करून विधी मंडळात लावून धरला. त्या सर्वांच्या भगिरथ प्रयत्नांचा परिपाक म्हणजे अमरावती विद्यापीठाची निर्मिती.

तत्कालीन मुख्यमंत्री मा.ना.वसंतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन शिक्षणमंत्री मा.ना. सुधाकरराव नाईक, मा. राज्यपाल आय.एच. लतीफ, श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विदर्भ महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यापीठ स्थापनेचा कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्र शासनाने अमरावती विद्यापीठ स्थापनेबाबतचा अध्यादेश २९ एप्रिल, १९८३ रोजी निर्गमित केला.

अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीनंतर विद्यापीठाच्या विकासासाठी व या भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विद्यापीठातर्फे मागील चाळीस वर्षात अनेक योजना, उपक्रम, प्रकल्प, परिसर विकास, शिक्षण, संशोधन, अध्यापनाचे कार्य आठ कुलगुरूंच्या नेतृत्वात यशस्वीपणे राबविण्यात आले. त्यासाठी विविध प्राधिकारीणींच्या सदस्यांनी आजवर विद्यापीटाच्या सर्वांगीण विकासासाठी



दिलेले योगदान महत्वपूर्ण ठरले आहे.

विद्यापीठाची स्थापना झाली त्यावेळी संलग्न महाविद्यालयांची संख्या ६७ होती, विद्यार्थी संख्या जवळपास २७ हजार व परीक्षांची संख्या ४९ होती. दि. २३ नोव्हेंबर, १९९० रोजी विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता मिळाली. चाळीस वर्षाच्या कालावधीत विद्यापीठाच्या कार्याचा आलेख प्रचंड विस्तारलेला आहे. आता विद्यापीठ परिसरात ३४ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग सध्या कार्यरत असून जवळपस २५०० चे वर विद्यार्थी परिसरात शिक्षण घेत आहेत. बुलढाणा येथे मॉडेल डिग्री कॉलेज आहे. पाचही जिल्ह्यात ४०४ महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्नित आहेत. जवळपास पाच लक्ष विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेत असून जवळपास ७०० परीक्षांचे संचालन विद्यापीठ करित आहेत.

विद्यापीठ स्थापनेपूर्वी पश्चिम विदर्भातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या संधी पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नव्हत्या. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेमुळे पाचही जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांकरीता शिक्षणाची दालने खुली झालीत. त्यामुळे अनेक विद्यार्थी या विद्यापीठातून उच्च शिक्षित झाले, आज ते देशासह विदेशात सुद्धा कार्यरत असून भारताच्या नावलौकिकेत भर घालीत आहेत, याचा आम्हा सर्वांना मनापासून आनंद आहे. विद्यापीठाने आज चाळीस वर्ष पूर्ण केलीत, दहा वर्षांनतर हे विद्यापीठ आपल्या स्थापनेचं सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करेल.

विद्यापीठाला आजवर स्व. डॉ. के. जी. देशमुख, डॉ. ग. व्यं. पाटील, स्व.डॉ. एस.टी. देशमुख, डॉ. सुधीर पाटील, महिला कुलगुरू डॉ.कमल सिंह, त्यानंतर डॉ. मोहन खेडकर, डॉ. मुरलीधर चांदेकर, स्व.डॉ. दिलीप मालखेडे हे कुलगुरू लाभलेत. सध्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्याकडे या विद्यापीठाच्या कुलगुरू पदाचा पदभार आहे. पाच विद्यापीठांच्या कुलगुरू पदाचा पदभार यशस्वीपणे सांभाळलेले ते बहुधा एकमेव आहेत. या सर्व कुलगुरूंची दूरदृष्टी, अभ्यास, त्याग व परिश्रम यामुळे या विद्यापीठाला आकार देतांना त्यांच्या मार्गदर्शनाचा फार मोठा लाभ मिळालेला आहे.

विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर तपोवन भागाला शासनाने जमीन अधिग्रहीत करुन दिली, ती जमीन ताब्यात घेणे, विद्यापीठ परिसराला कम्पाऊंड भिंत घालणे, मुख्य प्रशासकीय इमारती, अतिथीगृह, पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग, ग्रंथालये आदींची बांधकामे त्यानंतर झालीत. विद्यापीठाचा परिसर निसर्गरम्य असावा, याकरीता सुरुवातीपासूनच नियोजन करण्यात आले. परिसरात दोन मोठे जलाशय, अनेक बंधारे बांधण्यात आले. परिसरातील पाण्याची पातळी वाढावी आणि येथील नैसर्गिक संपदा वाढावी, यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत.

या परिसरात विविध क्रीडांगणांची निर्मिती, जलकुंभाची निर्मिती, सुंदर रस्ते, रस्त्यांच्या दुतर्फा उंचच उंच झाडे डौलाने उभी आहेत. आजमितीस परिसरामध्ये सुमारे तीन लक्ष चे वर झाडे आहेत. अमरावती शहरात ऑक्सीजन पार्क म्हणून विद्यापीठ परिसराचा नावलौकिक आहे. पर्यावरण संवर्धनात विद्यापीठाने केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून विद्यापीठाला महाराष्ट्र राज्य वनश्री पुरस्कार, स्व.



अजय किनखेडे स्मृती वनराईचा वनशेती अवार्ड, इंदिरा प्रियदर्शनी वृक्षमित्र राष्ट्रीय पुरस्कार, वसंतराव नाईक सामाईक पुरस्कार, मुंबई आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय पर्यावरण पुरस्कार, नवी दिल्ली या पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. याशिवाय उर्जा संवर्धन क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल राज्य शासनाच्या महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरणाचा (महाउर्जा) राज्यस्तरीय **उर्जा संवर्धन** पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. पर्यावरण क्षेत्रामध्ये कार्य करणाया व्यक्ती वा सामाजिक संस्थांचा गौरव म्हणून दरवर्षी पर्यावरणक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाया संस्था व व्यक्तीला पर्यावरण पुरस्कार देवून विद्यापीठाकडून गौरविल्या जाते. उत्कृष्ट कार्य करणाया विद्यापीठ तथा संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक, शिक्षक, अधिकारी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना उत्कृष्ठ सेवा गौरव पुरस्कार दरवर्षी १ मे विद्यापीठ वर्धापन दिनी देवून सन्मानीत केल्या जाते. याशिवाय नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी महाविद्यालयाला गौरविले जाते. संशोधनासाठी कल्पना चावला यंग लेडी रिसर्च अवार्ड दिल्या जातो.

संत गाडगे बाबांच्या कार्याचा सन्मान म्हणून ४ मे, २००५ रोजी महाराष्ट्र शासनाने अमरावती विद्यापीठाचे नामांतरण बाबांच्या नावाने केले. त्यांच्या विचार व कार्यानुसार हे विद्यापीठ चालावे, यासाठी सर्वजण कार्य करतात. विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारा समोर उभारलेले भव्यदिव्य बाबांचे संदेशशिल्प सर्वांना दशसूत्रीतील कार्याची प्रेरणा देते. गाडगे बाबांच्या विचार व कार्यानुसार कार्य करणाया व्यक्ती व संस्थांचा सन्मान दरवर्षी कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृति प्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार देवून केल्या जातो. संत गाडगे बाबांच्या विचाराचे जास्तीत जास्त अनुयायी तयार व्हावेत, समाजसेवा वृद्धींगत व्हावी हा त्यामागचा महत्तम उद्देश.



## ज्ञानप्रसार

विद्यापीठ ज्ञानस्त्रोत केंद्रात १.२५ लक्ष इतके ग्रंथ असून १६५ नियतकालिके आणि पाक्षिके आहेत. १३ ऑनलाईन डाटाबेस असून त्यात दहा हजारचेवर नियतकालिके समाविष्ट आहेत. ज्ञानस्त्रोत केंद्राच्या स्वतंत्र वेबसाईटवर संशोधकांकरिता माहितीस्त्रोत उपलब्ध असून त्याचा अनेक संशोधक विद्यार्थ्यांना लाभ मिळाला आहे व मिळत आहे. संलग्नित महाविद्यालयासाठी अभ्यासिकेची सुविधा केलेली असून यासंदर्भात करार केले आहेत. शहराच्या मध्यभागी रूक्मिणीनगर येथे विद्यापीठाचे निवासी ज्ञानस्त्रोत आणि संशोधन केंद्र लवकरच सुरू होत आहे.





## क्रीडा

क्रीडा क्षेत्रात विद्यापीठाच्या खेळाडूंनी गेल्या चाळीस वर्षामध्ये नेत्रदिपक कामगिरी केली आहे. पश्चिम विभागीय, अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर खेळल्या गेलेल्या सर्वच क्रीडा प्रकारात खेळाडूंनी पदके प्राप्त करून विद्यापीठाचे मानांकन वाढविले आहे. विश्व आंतर विद्यापीठ स्पर्धासह ऑलम्पिक स्पर्धेमध्ये सुद्धा या विद्यापीठाच्या खेळाडूंचा सहभाग उल्लेखनीय राहीला आहे.

क्रीडासह सांस्कृतिक स्पर्धांमध्ये कलावंत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाचा नावलौकिक देश पातळीवर पोहोचविला आहे. युवा महोत्सव, इंद्रधनुष्य, अश्वमेध यांसारख्या स्पर्धांमध्ये कलावंत विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रासह देश पातळीवर पदके व पारितोषिके मिळवून विद्यापीठाच्या नावलौकिकात भर घातली आहे. 'आव्हान' सारख्या स्पर्धांमुळे विद्यार्थी आपत्तकालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज होत आहे, ही नक्कीच जमेची बाजू असून स्वच्छतेला महत्व देणारे कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या संदेशानुसार राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी स्वच्छतेसह राष्ट्र निर्माणामध्ये सेवा देण्याकरीता दरवर्षी तयार होतात. आजवर लाखो स्वयंसेवक तयार झाले असून त्यांनी देशाचा नावलौकिक वाढविला आहे. एन.सी.सी. मधील या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग सुद्धा उल्लेखनीय आहे.

## संशोधन

संशोधन कुठल्याही विद्यापीठाचा महत्वाचा भाग असतो. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाव्दारे संशोधनावर आजवर भर दिल्या गेले आहे. तद्वतच महाविद्यालयांमध्ये सुद्धा संशोधनाचे कार्य मोठ्या प्रमाणावर झाले आहे. अनेक संशोधक विद्यार्थ्यांना आचार्य पदवीने गौरविण्यात आले. विद्यापीठ तसेच महाविद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षकांनी संशोधनपर पेटेन्ट सुद्धा मिळविली आहेत. विद्यापीठात संशोधनाचे कार्य निरंतरपणे सुरु असून आजवर पाच हजारचे वर संशोधकांचा आचार्य पदवीने गौरव झाला आहे. या शिवाय काही संशोधकांना डी.एस्सी. ने गौरविण्यात आले आहे.



अनेक देश-विदेशातील मान्यवरांनी या विद्यापीठाला भेटी दिल्या आहेत. निसर्गरम्य परिसर पाहून त्यांचे मनमोहक होतांना दिसले. महापुरुषांचे विचार व कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, यासाठी विद्यापीठात विविध अध्यासने सुरु आहेत. या अध्यासनांच्या माध्यमातून वर्षभर विविध ज्ञानवर्धक उपक्रम राबविले जातात. विद्यापीठाने आतापर्यंत सुप्रसिद्ध गायिका श्रीमती आशा भोसले, गांधीवादी विचारवंत समाजसेविका श्रीमती निर्मलाताई देशपांडे, माजी राष्ट्रपती माननीय डॉ. व्यंकटरमण, माजी कुलगुरू थोर साहित्यिक डॉ.व्ही.बी. कोलते व सुप्रसिद्ध समाजसेवक श्री शंकरबाबा पापळकर यांना डी.लिट देवून गौरविले आहे. विद्यापीठाच्या चाळीस वर्षाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये विविध प्राधिकारिणीवर कार्य करुन व प्रत्यक्ष सहभागी होवून सन्माननीय सदस्यांचे आणि विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभाग प्रमुख, अधिकारी, शिक्षक, कर्मचारी यांचे मोलाचे योगदान आहे.

विद्यापीठ परिसरात ३४ पद्व्युत्तर शैक्षणिक विभाग सध्या कार्यरत असून जवळपास २५०० चे वर विद्यार्थी शिक्षण घेतात. बुलढाणा येथे मॉडेल डिग्री कॉलेज आहे. पाचही जिल्ह्यात ४०४ महाविद्यालये विद्यापीठाशी संलग्नित आहेत. जवळपास पाच लक्ष विद्यार्थी या विद्यापीठातून शिक्षण घेतात. विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमधून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण दिले जात आहे. महाविद्यालयांचा दर्जा सातत्याने उंचावत आहे. आजवर १७१ महाविद्यालयांना नॅक मानांकन मिळाले असून त्यापैकी ३२ महाविद्यालयांना 'अ' दर्जा प्राप्त झाला आहे. भविष्यात यात आणखी वाढ होईल.

विद्यापीठाच्या चाळीस वर्षीय वटवृक्षाने विकासाचे डौलदार रुप धारण केले आहे. दशकानंतर सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होईल. ज्या आशा-अपेक्षाने विद्यापीठ स्थापन झाले होते, ती पूर्ण झाल्याचा आनंद आम्हा सर्वांना आहे. भविष्यात मेळघाटासह दुर्गम भागातील फर्स्ट लर्नर पर्यंत उच्च शिक्षणाच्या कक्षा अधिक रुंदावण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. उच्च शिक्षणातील जी.ई.आर. वाढविण्यामध्ये या विद्यापीठाचे योगदान निश्चितच मोलाचे असणार आहे. पाचही जिल्ह्यांतील महाविद्यालयांच्या रुपाने मिळणारी मोलाची साथ या विद्यापीठाची बलस्थाने आहेत. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण देण्याची जबाबदारी विद्यापीठ समर्थपणे सांभाळेल आणि आमच्या विद्यार्थ्याला एक नवी दिशा मिळेल. कौशल्याधिष्ठीत विद्यार्थी घडेल असाही



आम्हाला विश्वास आहे. संत गाडगे बाबांचा वारसा लाभलेले पश्चिम विदर्भातील हे विद्यापीठ जगाच्या नकाशावर ओळखल्या जाईल, हीच चाळीस वर्षपूर्ती निमित्ताने अपेक्षा. महाराष्ट्र राज्य स्थापना दिन, विद्यापीठ वर्धापन दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा।

**- (डॉ. विलास नांदुरकर)**
**जनसंपर्क अधिकारी**










CHEMISTRY



वनस्पतिशास्त्र






LIBRARY

PHYSICS


# विद्यापीठात दंत तपासणी शिबीर




**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व दंत महाविद्यालय-रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने दंत तपासणी शिबिराचे पदव्युत्तर शिक्षण विभागात आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. गजानन गुल्हाने हे होते. अधिष्ठाता व दंत शल्य चिकित्सक डॉ. राजेश गोंधळेकर, विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्मिता थोरात, डॉ. योगेश तसेच दंत महाविद्यालय-रुग्णालयाची चमू यांनी शिबिराला मार्गदर्शन केले. दातांच्या समस्या, निगा कशी राखावी याविषयी डॉ. गोंधळेकर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. गजानन गुल्हाने यांनी दातांच्या आरोग्याचे महत्त्व, व्यसनापासून मुक्त राहावे, असा सल्ला दिला. दंत महाविद्यालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून दाताच्या आरोग्याबाबत मोलाचा सल्ला दिला. शिबिरात ४० जणांनी दंत तपासणी करून घेतली. शिबिराला पदव्युत्तर शिक्षण विभागातील सर्व प्राध्यापकवृंद, प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## एम.जी.एम. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांची विद्यापीठाला भेट नवीन शैक्षणिक धोरणावर चर्चा



**एम.जी.एम.** विद्यापीठ, औरंगाबादचे कुलगुरूडॉ. विलास सपकाळ यांनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला भेट देवून प्र–कुलगुरूडॉ. प्रसाद वाडेगांवकर यांचेशी चर्चा केली. भेटीप्रसंगी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी कशी करता येईल, या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. स्टीअर कमिटीने ठरविल्याप्रमाणे पुढील कार्यवाहीबाबत दोघांमध्ये सविस्तर चर्चा झाली. नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थीहितार्थ असून या धोरणाची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक सत्रापासून करावयाची आहे. त्यादृष्टीने उचलावयाची पाऊले, दिशा, याबाबत विचारमंथन करण्यात आले. ह.व्या.प्र. मंडळाच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे यांनी यावेळी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला.

सुरुवातीला प्र–कुलगुरूडॉ. प्रसाद वाडेगांवकर यांनी एम.जी.एम. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ यांचे विद्यापीठाच्यावतीने स्वागत केले.

# विद्यापीठातील शैक्षणिक विभाग प्रमुखांची आता होणार रोटेशन पध्दतीने निवड



### कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत निर्णय

### कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांचा महत्वपूर्ण पुढाकार

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शैक्षणिक विभागामध्ये कार्यरत सर्व शिक्षकांना विभागप्रमुख होण्याची संधी मिळाली, यासाठी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या पुढाकाराने आणि अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतला आहे. त्यांचे सार्वत्रिक अभिनंदन होत आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील शैक्षणिक विभाग प्रमुखांची आता आळीपाळीने तथा रोटेशन पध्दतीने निवड होणार आहे. यासाठी एक समितीही गठीत करण्यात आली असून बुधवारी २६ एप्रिल रोजी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्यामुळे शैक्षणिक पदव्युत्तर विभागातील कार्यरत कनिष्ठ प्राध्यापकांना विभागप्रमुख होण्याची संधी मिळाली आहे.

विद्यापीठात पदव्युत्तर शैक्षणिक विभाग कार्यरत आहेत. या विभागांमध्ये वरिष्ठ प्राध्यापक हे विभागप्रमुख असतात. परिनियम ५५ अन्वये सेवाज्येष्ठ शिक्षकाला विभागप्रमुख म्हणून निवडल्या जाते. त्यामुळे सेवाज्येष्ठ नसलेल्या शिक्षकांना विभागप्रमुख होण्याची संधी मिळत नव्हती. कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत हा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

विद्यापीठामध्ये एकूण ३४ शैक्षणिक पदव्युत्तर विभाग आहेत. या विभागांमध्ये विभागप्रमुख म्हणून सेवाज्येष्ठ शिक्षक कार्यरत असतात. आता व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार दर तीन वर्षांने रोटेशन पध्दतीने विभागातील शिक्षकांना विभागप्रमुख होण्याची संधी मिळणार आहे. या संदर्भात उक्त परिनियमात दुरुस्ती करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या सभेत समिती गठीत करण्यात आली आहे. व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.




# विद्यापीठात 'उच्च शिक्षण संस्था प्रणालीसाठी मूल्यांकन आणि मान्यता प्रक्रिया' यावर हँडहोल्डिंग सेशन यशस्वीरित्या संपन्न

**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'उच्च शिक्षण संस्था प्रणालीसाठी मूल्यांकन आणि मान्यता प्रक्रिया' या विषयावर हँडहोल्डिंग सेशन डॉ. के.जी. देशमुख सभागृहात यशस्वीरित्या संपन्न झाले. उद्‌घाटन कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर, नॅक बंगलोर वेस्टर्न रिजनचे समन्वयक तथा सल्लागार डॉ. देवेंदर कावडे व उपसल्लागार डॉ. प्रशांत परहाद, आय.क्यू.ए.सी. चे संचालक डॉ. संदीप वाघुळे व्यासपीठावर उपस्थित होते.

उद्‌घाटन सत्रात मार्गदर्शन करतांना सहसंचालक डॉ. नलिनी टेंभेकर म्हणाल्या, 'परिसस्पर्श' या शासनाच्या योजनेची माहिती होण्याच्या दृष्टिने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी येत्या सत्रापासून करावयाची आहे. सर्व महाविद्यालयांचे नॅक झाले पाहिजे, यावर शासनाचा भर आहे. आपल्या महाविद्यालयांचे नॅक व्हावे, यासाठी सर्वांनी कसोशिने प्रयत्न करावेत. महाविद्यालयांना आर्थिक सहाय्य म्हणून नऊ कोटी रुपयाचा निधी शासन देणार असल्याची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली. ज्या महाविद्यालयांचे नॅक झाले नाही वा दर्जा कमी आहे, अशा महाविद्यालयांना मार्गदर्शन करण्याकरीता मार्गदर्शक महाविद्यालयांची निवड करणार असल्याची माहिती त्यांनी याप्रसंगी दिली.

प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर म्हणाले, शिक्षण क्षेत्रात संस्थात्मक वाढ होत आहे, त्या तुलनेत गुणात्मक वाढ होण्याची सुध्दा गरज आहे. गुणात्मक वाढ होण्यासाठी मूल्यांकन व मानांकन प्रक्रिया आहे. ३० मार्च पर्यंत नॅक ची प्रोसेस व्हायला पाहिजे, अन्यथा येत्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे प्रवेश होणार नाहीत, असे शासनाने स्पष्ट केले होते, त्यामुळे या बाबीची महाविद्यालयांनी दखल घ्यावयाची आहे आणि लवकरात लवकर नॅकच्या प्रक्रियेत सहभागी व्हायचे आहे. महाविद्यालयांत नियमित शिक्षक असलेच पाहिजे, शिक्षक जर नसेल, तर त्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश होणार नाहीत, असेही ते म्हणाले. विद्यापीठ, शासन आणि नॅकची महाविद्यालयांना निश्चितच मदत होणार आहे.

**कार्यशाळेच्या** प्रथम तांत्रिक सत्रात असेसमेन्ट ॲन्ड ॲक्रेडिटेशन प्रोसेस फॉर हायर एज्युकेशन इन्स्टिट्युट्स या विषयावर उपस्थितांना मार्गदर्शन करतांना नॅक बंगलोरचे सल्लागार डॉ. देवेंदर कावडे यांनी करिक्युलर अस्पेक्ट्स अंतर्गत करिक्युलम डिझाईन ॲन्ड डेव्हलपमेन्ट, ॲकेडमिक फ्लेक्झिबिलिटी, करिक्युलम एन्‌रिचमेंट व फीडबॅक सिस्टिम, टिचिंग, लर्निंग ॲन्ड इव्हॅल्युशन अंतर्गत स्टुडंट एनरोलमेंट ॲन्ड प्रोफाईल, कॅटेरिंग टू स्टुडंट डायव्हर्सिटी, टिचिंग-लर्निंग प्रोसेस, टिचर प्रोफाईल ॲन्ड क्लॉलिटी, इव्हॅल्युशन प्रोसेस ॲन्ड रिफॉर्म्स, स्टुडंट परफॉर्मन्स ॲन्ड लर्निंग आऊटकम्स व स्टुडंट सॅटिसफॅक्शन सर्व्हे, रिसर्च, इन्नोव्हेशन्स ॲन्ड एक्सटेन्शन्स, इन्फ्रास्ट्रक्चर ॲन्ड लर्निंग रिसोर्सेस, स्टुडंट सपोर्ट ॲन्ड प्रोग्रेशन, गव्हर्नन्स, लिडरशीप ॲन्ड मॅनेजमेंट, इन्स्टिट्युशनल व्हॅल्युज ॲन्ड बेस्ट प्रक्टीसेस यावर पी.पी.टी. प्रेझेन्टेशनव्दारा सविस्तर माहिती दिली. कार्यशाळेच्या व्दितीय सत्रात उपस्थितांना मार्गदर्शन करतांना नॅक, बंगलोरचे उपसल्लागार डॉ. प्रशांत परहाड यांनी एलिजिबिलीटी क्रायटेरिया टू अप्लाय फॉर असेसमेन्ट ॲन्ड ॲक्रेडिटेशन प्रोसेस ऑफ नॅक, ऑनलाईन असेसमेन्ट ॲन्ड ॲक्रेडिटेशन प्रोसेस, रजिस्ट्रेशन प्रोसेस, आय.आय.क्यू.ए. अप्लीकेशन प्रोसेस, प्रोसेस ऑफ डी.व्ही.व्ही., एक्सटेन्डेड प्रोफाईल ऑफ द क्यू.आय.एफ., प्री-क्वॉलिफिकेशन स्टेज, स्टुडंट सॅटिसफॅक्शन सर्व्हे आदींबाबत पी.पी.टी. प्रेझेन्टेशनव्दारा उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी डॉ. वर्षा देशमुख, डॉ. अजय कुकडे, डॉ. फुंडकर, डॉ. नागेश गायकवाड, डॉ. विजय अग्रवाल, प्रा. प्रवीण उगले, प्रा. मांगडिया, प्रा. विशाल गजभिये तसेच संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य व त्यांचे प्रतिनिधी, आ.क्यु.ए.सी. चे समन्वयक यांनी विचारलेल्या प्रश्नांची नॅकचे सल्लागार डॉ. देवेंदर कावडे व उपसल्लागार डॉ. प्रशांत परहाड यांनी समर्पक उत्तरे दिलीत.

विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुस्तक व स्मृतीचिन्ह देऊन पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक व स्वागतपर भाषण आय.क्यू.ए.सी. संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी केले. संचालन करीत आभार एच.आर.डी. च्या डॉ. वर्षा कुमार यांनी केले. हॅंडहोल्डिंग सेशनला विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, आय.क्यू.ए.सी. चे समन्वयक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी यात १६० प्रतिनिधींनी नोंदणी केली.

# व्यवसाय क्षेत्रात इंग्रजी संभाषण कौशल्याचे महत्व

## यांचे प्रतिपादन प्रा.आनंद मांजरखेडे




**व्यवसाय** क्षेत्रात इंग्रजी संभाषण कौशल्याला महत्व आहे, असे प्रतिपादन प्रा. आनंद मांजरखेडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातर्फे आयोजित अतिथी व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील होते. याप्रसंगी प्रा. मांजरखेडे यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजी संभाषण कौशल्याबाबत विस्तृत मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. श्रीकांत पाटील यांनी विद्यार्थ्यांनी इंग्रजी संभाषण कौशल्य वाढविण्याचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे संचालन प्रा. माधुरी पुनसे, आभार कांचन हिरूडकर यांनी मानले.

# कर्तव्यपूर्ती सोहळ्यात विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

## दिलेल्या सेवेच्या कर्तव्यपूर्तीचा मोठा आनंद असतो - कुलसचिव डॉ. तुषार देशमुख



**सेवानिवृत्त** होत असतांना कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेच्या कर्तव्यपूर्तीचा त्यांना मोठा आनंद असतो व विद्यापीठालाही त्यांचा अभिमान आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. शनिवारी दि. २९ एप्रिल, २०२३ रोजी विद्यापीठातील वित्त विभागातील कर्मचारी श्री आर.डी. हटवार व आय.क्यू.ए.सी. विभागातील श्री आर.डी. कोकाटे यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य डॉ. वैशाली गुडधे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. नितीन कोळी, आय.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे, सत्कारमूर्ती श्री राजेंद्र हटवार, श्री राजाराम कोकाटे यांची उपस्थिती होती.



कुलसचिव डॉ. तुषार देशमुख पुढे म्हणाले, विद्यापीठातील कर्मचारी सेवानिवृत्त होत असतांना दुसरीकडे मनुष्यबळाची पोकळी देखील निर्माण होत आहे. ही पोकळी भरुन काढण्यासाठी प्रशासनाकडून शासनाकडे पाठपुरावा सुध्दा केला जात आहे. ७२ जागांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून, त्यातील पन्नास टक्के जागा जरी शासनाने मंजूर केल्यात, तर विद्यापीठातील सेवा सुरळीत होईल. सत्कारमूर्तींची कामाप्रती नेहमीच तळमळ राहिलेली आहे व विद्यापीठाला सुध्दा त्यांचा अभिमान आहे, असे सांगून श्री हटवार व श्री कोकाटे यांना त्यांनी पुढील आयुष्याच्या शुभकामना दिल्या.



सत्कारमूर्ती श्री राजेंद्र हटवार मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, तीस वर्षे दोन महिने विद्यापीठाला सेवा दिली. संगणकीय प्रणाली सुरू झाल्यावर कामे अगदी वेगाने पार पाडली गेली. एका ऑस्ट्रेलियन व्यक्तीने डॉलरने शुल्काचा भरणा केला होता, तो प्रसंग सांगतांना बँकेत जेव्हा डॉलर जमा करावयास गेलो तेव्हा बँकेने परकिय चलन घेण्यास नकार दिल्याने अडचण निर्माण झाली होती.

मग त्यातून बँकेने मार्ग सूचवला व नागपूर येथे जावून भारतीय स्टेट बँकेत डॉलर जमा करुन नंतर ते भारतीय चलनात परिवर्तीत केले असे श्री हटवार यांनी सांगितले. श्री राजाराम कोकाटे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, प्रदिर्घ सेवा झालेली आहे व यादरम्यान आपल्याला सर्वांनी नेहमीच सहकार्य केले त्यांचा मी आभारी आहे. प्रमुख अतिथी डॉ. वैशाली गुडधे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. नितीन कोळी, आ.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्कारमूर्ती श्री राजेंद्र हटवार व श्री राजाराम कोकाटे यांचा कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला. तर सौ. हटवार व सौ. कोकाटे यांचा सौ. प्रज्ञा बोंडे यांचा साडीचोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. तसेच विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे व सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्ती श्री हटवार व श्री कोकाटे यांना कर्मचारी कल्याण निधीचा धनादेश देऊन सत्कार केला.



कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, विद्यापीठ गीताने व मान्यवरांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबियांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.












विद्यावार्ता

# विद्यापीठात वर्ल्ड आय.पी.आर. डे उत्साहात संपन्न

## पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्कबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन






**संत** गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील इनोव्हेशन, इन्क्युबेशन ॲन्ड लिंकेजेसच्यावतीने विद्यार्थ्यांना इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी राईटची माहिती व्हावी या उद्देशाने कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच वर्ल्ड आय.पी.आर. डे चे आयोजन करण्यात आले होते.या माध्यमातून विद्यार्थी संशोधन अथवा इनोव्हेशनची जपवणूक करू शकतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी सौ. योगिता पवार यांनी विद्यार्थ्यांना पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क आदींविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. प्रास्ताविकातून संचालक डॉ. स्वाती शेरेकर यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील भूमिका मांडली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरता श्री अमोल हिरूळकर, श्री नरेश मोहाळे, श्री अंकित ठाकूर, श्री रवी ढेंगळे यांनी परिश्रम घेतले.

# विद्यापीठाच्या सहा विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीमध्ये निवड

## कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांनी केले विद्यार्थ्यांचे अभिनंदन



Mr.Ravi R. Pandey | Mr. Kunal Tote | Mr. Yash Junghare | Mr. Dhiraj Chavan



**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रासायनिक तंत्रशास्त्र विभागातील अंतिम वर्षाच्या रवि पांडे, धीरज चव्हाण, कुणाल तोटे व यश जुनघरे या विद्यार्थ्यांची पुणे येथील सॅटोल या नामाकिंत कंपनीत निवड झाली आहे.. कॅम्पस ड्राईव्हद्वारे ही निवड प्रक्रिया झाली. समन्वयक डॉ.एन.बी. सेलुकर यांनी कॅम्पस ड्राईव्हकरीता प्रयत्न केले.

कुलगुरू डॉ. प्रमोद येवले, प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, रासायनिक तंत्रशास्त्र विभागप्रमुख डॉ. ए. बी. नाईक, विभागातील डॉ. पी. बी. शिंगवेकर, डॉ. एन.बी. सेलुकर, डॉ. पी. के. वानखडे, श्री. ए. एल. राठोड, डॉ. एम. बी. कुंभारे तसेच सर्व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विद्यापीठातील योगशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा उरळी कांचन येथे अभ्यास दौरा





निसर्गोपचार चिकित्सा प्रणाली व स्वरूप यांची ओळख व्हावी, या उद्देशाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदव्युत्तर पदविका योग थेरपी, पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा नुकताच उरळी कांचन येथील प्राकृतिक चिकित्सा केंद्र येथे अभ्यास दौरा झाला. महात्मा गांधीनी स्थापन केलेल्या तेथील निसर्गोपचार आश्रम या संस्थेमध्ये विविध विकारांवर नैसर्गिक पध्दतीने उपचार केले जातात, त्याचबरोबर नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ नॅचरोपॅथी पुणे ही भारत सरकार आयुष मंत्रालयाव्दारा चालविण्यात येणारी संस्था असून या संस्थेच्या संचालिका डॉ. सत्यलक्ष्मी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कबिर बाग, योग मठ, पुणे येथेही भेट देण्यात आली. मठाच्या संचालिका डॉ. अनघा भिडे यांनी प्रात्याक्षिकाव्दारे पारंपारिक योग पध्दतीचे सादरीकरण करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांची प्रेरणा व विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या अभ्यास दौ-याचे आयोजन करण्यात आले होते. याकरीता समन्वयक डॉ. अश्विनी राऊत, प्रा. आदित्य पुंड, प्रा. अनघा देशमुख, प्रा. राधिका खडके, प्रा. राहुल दोडके, प्रा. संदिप महल्ले, प्रा. हरिष धुले, प्रा. भूषण परळीकर यांनी प्रयत्न केलेत. अभ्यास दौ-यामध्ये अनिरुध्द राऊत, प्रयोग निस्ताने, शुभम मेटांगे, स्वाती लोखंडे, नुतन निंघोट, सागर सहारे, श्रीकांत पाटील, विलास राऊत, नम्रता सिरसाठ आदी विद्यार्थ्यांचा सहभाग होता.



# गणित विभागात राष्ट्रीय गणित दिवस निमित्त विद्यापीठ स्तरीय पोस्टर, सेमिनार आणि गणितीय रांगोळी स्पर्धा संपन्न





कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर



**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रासायनिक तंत्रशास्त्र विभागाच्यावतीने 'ॲडव्हॉन्सेस इन केमिकल टेक्नॉलॉजी' या विषयावर एक दिवसीय सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. दिपक चाचरकर, प्रमुख अतिथी म्हणून ओ.एन.ए.सी. चे प्रबंध संचालक श्री रवी बोरकर यांची उपस्थिती होती. श्री रवी बोरकर यांनी याप्रसंगी चित्रफीतीव्दारे ओ.एन.जी.सी. च्या उपक्रमाबद्दल मार्गदर्शन केले. यु.जी.सी., एस.ए.पी. चे समन्वयक डॉ. नाईक यांनी एस.ए.पी. बाबत माहिती दिली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. चाचरकर म्हणाले, विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतांना समाजोपयोगी आलो पाहिजे. कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रशांत शिंगवेकर, आभार डॉ. पी. के. वानखडे यांनी मानले.

दुपारच्या सत्रात श्री रवी बोरकर यांनी एन्टरप्रिनरशिप गाईडलाईन ऑफ यंग इंजिनिअर्स या विषयावर बीजभाषण दिले. त्यानंतरच्या सत्रात एल.आय.टी. नागपूरचे श्री. प्रदीप शेंडे यांनी मॉडेलिंग ॲन्ड सिम्युलेशन याविषयी पी.पी.एफ.व्दारे माहिती दिली. श्री. अरूण भोगे यांनी ओव्हरसिज जॉब अपॉर्च्युनिटी यावर विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना विदेशात नोकरीसाठी लागणारी गुंणवत्ता विद्यार्थ्यांनी कशी विकसित करावी, यावर मार्गदर्शन केले. शेवटच्या सत्रात डी.एस. ग्रुप नोएडाचे श्री वृद्रला श्रीनिवास यांनी अन्न उद्योगातील कौशल्य यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. ए. बी. नाईक, तर श्री वृद्रला श्रीनिवास प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संपूर्ण चर्चासत्राचे संचालन व नियोजन डॉ. एन.बी. सेलूकर यांनी केले. यासंगी विभागाचे डॉ. मराठे यांचा शाल व वाम्रपट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. मराठे यांनीही विद्यार्थ्यांना मागदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणातून डॉ. नाईक यांनी विभागाच्या प्रगतीचा आलेख मांडला. सर्वप्रथम संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन डॉ. प्रशांत शिंगवेकर यांनी, तर आभार श्री अशोक राठोड यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विभागातील श्री. धीरबस्सी, श्री बुरघाटे, श्री सुरज वानखडे तसेच शिक्षकवृंद, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

विद्यावार्ता



## विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात व्याख्यान संपन्न

# पंचमहाभुतांचे संतुलन आपल्या हातात

**- डॉ. भारतभूषण शर्मा**



**पंचमहाभूते** सर्वांना परिचित आहेत. आयुर्वेद, निसर्गोपचार व इतर चिकित्सा पद्धतीमध्ये पंचमहाभूतांचे महत्त्व आहे. या पंचमहाभुतांमध्ये असंतुलन झाल्यास शारीरिक व्याधी निर्माण होतात. पंचमहाभूतांना संतुलित ठेवणे शरीर स्वास्थ्याकरीता फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन व्याख्याते डॉ. भारतभूषण शर्मा यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन विस्तार विभागातील पदव्युत्तर पदविका योगा थेरपी व पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार आणि योगशास्त्र अभ्यासक्रमाच्यावतीने द्विदिवसीय अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. श्रीकांत पाटील, प्रमुख अतिथी म्हणून हरियाणा येथील डॉ. भारतभूषण शर्मा, डॉ. अनिल चौधरी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. शर्मा यांनी मुद्राथेरपी, कर्ण ॲक्यूप्रेशर, नाभी चिकित्सा अशा अनेक विषयांवर सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात संचालक डॉ श्रीकांत पाटील म्हणाले, चिकित्सा पद्धत दैनंदिन जीवनात अगदी सहजच आपण करू शकतो. नवनवीन चिकित्सा पद्धती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात, विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवू नये, तर वेगवेगळे कौशल्य, ज्ञान व अनुभव घेतले पाहिजे, त्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून या माध्यमातून एक सक्षम रोजगाराभिमुख विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने करण्यात आली. अतिथींचे स्मृतिचिन्ह देऊन डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्वागत केले. संचालन प्रयोग निस्ताने, तर आभार नेहा माकोडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता डॉ. अश्विनी राऊत, प्रा. आदित्य पुंड, प्रा. राहुल दोडके, प्रा. संदीप महल्ले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला सर्व अभ्यासक्रमाचे समन्वयक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षकांची फिजिओ क्लिनिकला भेट

## निरोगी आरोग्यासाठी फिजिओथेरपी उपयुक्त - डॉ. मृणाल वाघमारे




**धावपळीच्या** काळात मनुष्य यंत्रावत काम करू लागला आहे. त्याचे अनेक दुष्परिणाम आरोग्यावर होत आहे आणि अशा वेळी अनेक प्रकारचे उपचारही केले जातात, मात्र फिजिओथेरपी ही आधुनिक उपचार पद्धती अशावेळी फायदेशीर आहे, असे मत स्थानिक राजकमल चौक स्थित फिजिओथेरपी क्लिनिकच्या न्युरोतज्ज्ञ डॉ. मृणाल वाघमारे यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदव्युत्तर पदविका योगथेरपी, पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार व योगशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत शिक्षक, विद्यार्थ्यांनी क्लिनिकला भेट दिली, त्यावेळी त्यांनी प्रस्तूत विचार व्यक्त केले. डॉ. मृणाल वाघमारे यांनी यावेळी फिजिओथेरेपीमधील चिकित्सा प्रणालीची माहिती दिली.

फ्रॅक्चरसंबंधी विकार, शस्त्रक्रियेनंतरचे व्यायाम, स्नायुचे दुखणे पॅरॉलिसिस, पोलिओ, पाठ दुखी, मणक्यांचे विकार, संधीवात, पार्किंनसोनीझम, सेरेब्रल पाल्सी, चेह-याचा पॅरॉलिसिस आदी आजारांवर फिजिओथेरपी कशी लाभकारक ठरते, याविषयी डॉ. मृणाल वाघमारे यांनी माहिती दिली. या चिकित्सा पध्दतीचा विद्यार्थ्यांनी समाजाला कसा लाभ घेता येईल व आपला स्वंयरोजगार उभारण्यासाठी त्याचा उपयोग करावा असे आवाहन याप्रसंगी डॉ. वाघमारे यांनी केले. यावेळी समन्वयिका डॉ. अश्विनी राऊत, समन्वयक प्रा. आदित्य पुंड यांनी डॉ. मृणाल वाघमारे यांचे पुस्तक देऊन आभार मानले. प्रा.राहुल दोडके, प्रा.संदीप महल्ले तसेच विद्यार्थ्यांचा यावेळी सहभाग होता.

## केमिकल टेक्नॉक्लॉजीच्या विद्यार्थ्यांचा पाणी शुद्धीकरण प्रकल्पास अभ्यासदौरा



**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील केमिकल टेक्नॉलॉजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी अमरावती शहरातील पाणी शुद्धीकरण प्रकल्पाला नुकतीच भेट देऊन पाणी शुध्दीकरण प्रक्रियेचा अभ्यास केला. प्रकल्पापासून तर घरच्या नळाला येणा-या पाण्याचे कशाप्रकारे शुध्दीकरण केल्या जाते, याची टप्प्याटप्प्याची प्रक्रिया विद्यार्थ्यांनी या अभ्यासदौ-यावेळी जाणून घेतली. या अभ्यासदौ-याला विभागाचे समन्वयक डॉ. एम.बी. कुंभारे, कर्मचारी श्री. बी. डी नारखेडे, कु. नेहा बोंडे यांचे सहकार्य लाभले. अभ्यासदौ-यामध्ये सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग होता.



# विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी





**संत** गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले.



# विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी



**राष्ट्रसंत** तुकडोजी महाराज यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, हारार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.संचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी केले.

विद्यावार्ता

विदर्भ मतदार

# अब बिजली हादसों पर लगेगा अंकुश

## हव्याप्र इंजीनियरिंग कॉलेज के प्रोजेक्ट को अमरावती विद्यापीठ ने दी मंजूरी



कार्यालय प्रतिनिधि| अमरावती बिजली के कारण होने वाले हादसों को रोकने के लिए नई पहल की गई है। मुख्य रूप से घरेलू और कृषि क्षेत्र में बिजली की खपत अधिक होती है। बिजली वितरण कंपनी बिजली के सुरक्षित उपयोग को सुनिश्चित करने पर विशेष ध्यान देती है। उसके लिए विशेष उपकरण और बिजली की फिटिंग बनाई जाती है। लेकिन सर्वे में चौंकाने वाली जानकारी सामने आई है कि देश में हर दिन बिजली के करंट से 30 नागरिकों की मौत होती है। मानसून और गर्मी में ऐसी घटनाओं में इजाफा होता है। इसलिए सभी को बिजली से बचाने की जागरूकता के साथ श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडल द्वारा संचालित इंजीनियरिंग कॉलेज ने यह पहल की है। एक साल के भीतर पूरी होने वाली इस महत्वाकांक्षी शोध परियोजना से घरों और कृषि में बिजली दुर्घटनाओं को अब 'ब्रेक' लगेगा।

समाज के खातिर अवधारणा पर श्री हव्याप्र कॉलेज ऑफ इंजीनियरिंग ने बिजली करंट दुर्घटनाओं की सामाजिक समस्या पर ध्यान केंद्रित किया। प्रौद्योगिकी इस तरह की घटनाओं को कैसे रोक सकती है, इस पर विचार करते हुए, कॉलेज ने ''डिजाइन एंड फेब्रिकेशन ऑफ इन्सुलेशन फेलिअर डिटेक्शन सिस्टम फॉर एग्रीकल्चर पंप एंड डोमेस्टिक अप्लाएन्सेस वीथ मैटेलिक इनक्लोजर' प्रकल्प को लागू करने की पहल की। प्रोजेक्ट हेड प्रथम वर्ष विभागाध्यक्ष डॉ. सारंग खोंड और प्रो. प्रणव पत्तेवार इस पर कार्य कर रहे हैं। संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय अमरावती और राजीव गांधी विज्ञान और प्रौद्योगिकी आयोग महाराष्ट्र राज्य को एक योजना प्रस्तुत की गई थी। पुनरीक्षण प्रक्रिया में 117 प्रस्ताव प्रस्तुत किए गए। इनमें से 17 प्रकल्पों को मंजूरी दी गई, इसमें श्री हव्याप्र इंजीनियरिंग की 'फेलीवर डिटेक्शन सिस्टम' परियोजना को प्राथमिकता दी गई। यह प्रोजेक्ट एक साल के भीतर पूरा हो जाएगा और इसका फायदा आम लोगों को 'जीवनदायनी' होगा।

**घर और खेत होंगे 'शॉक प्रूफ'** विद्युत दुर्घटनाओं के अधिकांश मामले घरों और कृषि में होते हैं। हालांकि झटके और दुर्घटनाओं के कारण अलग-अलग होते हैं, जीवन की हानि एक प्रमुख मुद्दा है और सुरक्षा व्यवस्था के लिए एक चुनौती है। इस चुनौती को पूरा करने के लिए यह पहल की गई है। इसका लक्ष्य सुरक्षित समाज के लिए प्रयास करना है। शोध को समाज के लिए उपयोगी बनाने के लिए एक 'इलेक्ट्रिक मोशन डिटेक्शन सिस्टम' बनाया जाएगा। इससे बिजली के झटके से होने वाली दुर्घटनाओं की संख्या में कमी आएगी। ऐसा विश्वास प्रोजेक्ट हेड डॉ. सारंग खोंड, प्रकल्प सहायक प्रा. प्रणव पत्तेवार ने व्यक्त किया।



# योगशास्त्राच्या विद्यार्थ्यांचा उरळी कांचन येथे अभ्यास दौरा

**अमरावती (विदर्भ मतदार प्रतिनिधी) :** निसर्गोपचार चिकित्सा प्रणाली व स्वरूप यांची ओळख व्हावी, यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदव्युत्तर पदविका योग थेरपी, पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचा उरळी कांचन येथील प्राकृतिक चिकित्सा केंद्र येथे अभ्यास दौरा नुकताच झाला. महात्मा गांधींनी स्थापन केलेल्या निसर्गोपचार आश्रम या संस्थेमध्ये विविध विकारांवर नैसर्गिक पध्दतीने उपचार केले जातात. पुणे येथील नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ नॅचरोपॅथी संस्थेच्या संचालिका डॉ. सत्यलक्ष्मी यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कबिर बाग, योग मठ येथेही भेट देण्यात आली. मठाच्या संचालिका डॉ. अनघा भिडे यांनी प्रात्यक्षिकाव्दारे पारंपारिक योग पध्दतीचे सादरीकरण व मार्गदर्शन केले. अभ्यास दौ-यामध्ये अनिरुध्द राऊत, प्रयोग निस्ताने, शुभम मेटांगे, स्वाती लोखंडे, नुतन निंघोट, सागर सहारे, श्रीकांत पाटील, विलास राऊत, नम्रता सिरसाठ आदी विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

# महात्मा फुले यांच्या तत्वज्ञानाला वैज्ञानिक चौकट

## डॉ. उमेश बगाडे — विद्यापीठात व्याख्यान



**अमरावती (विदर्भ मतदार प्रतिनिधी) :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या वाङ्मयामध्ये गंभीर अशी तत्व मिमांसा आहे. अविद्येचे अनेक अर्थ आहेत. त्याचा ईलिटरसी असा आपण समज करतो, परंतु चुकीचे आकलन हा देखील त्याचा अर्थ आहे. ज्ञानाच्या तीन कसोट्या महात्मा फुले यांनी सांगितल्या आहेत, त्याचा तर्कज्ञान सिध्दांकीता वापर त्यांनी सांगितला. त्यामुळे महात्मा फुले यांच्या तत्वज्ञानाला वैज्ञानिक चौकट आहे असे प्रतिपादन प्रसिध्द वक्ते व छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठातील डॉ. उमेश बगाडे यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील डॉ.आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या समता समारोहप्रसंगी विद्यापीठातील अधिसभागृह येथे आयोजित 'महात्मा फुले यांची तत्व मिमंसा' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगांवकर, प्रमुख अतिथी म्हणून अधिसभा सदस्य प्राचार्य डॉ. सुभाष गवई, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांची उपस्थिती होती.

प्रास्ताविक डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड यांनी केले. संचालन प्रा. अभिजित इंगळे, तर आभारप्रदर्शन डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यावार्ता

विदर्भ मतदार

# विद्यापीठस्तरीय पोस्टर, सेमिनार आणि गणितीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन



**अमरावती (विदर्भ मतदार प्रतिनिधी) :** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्यूत्तर गणित विभागात राष्ट्रीय गणित दिवसाच्या अनुषंगाने विद्यापीठस्तरीय पोस्टर, सेमिनार आणि गणितीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षपदी प्र-कुलगुरू डॉ. पी. ए. वाडेगावकर तसेच प्रमुख पाहुणे प्रा. के. एस. अढाव, प्रा. व्ही. बी. राऊत तसेच प्रा. एस. एस. शेरेकर उपस्थित होते.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करून विद्यापीठ गीताने कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. तसेच पुष्प-सुमनांनी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना प्रा. एस. एस. शेरेकर यांनी केली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना प्रा. के. एस. अढाव, प्रा. व्ही. बी. राऊत तसेच डॉ पी. ए. वाडेगावकर यांनी मार्गदर्शन केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर पाहुण्यांनी पोस्टर,



सेमिनार आणि रांगोळी यांचे परीक्षण केले. याप्रसंगी डॉ. पी. आर. अग्रवाल, एच. जि. परळीकर, एम. सी. धाबे हे परीक्षक म्हणून लाभले. पोस्टर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक आचल शरद जगताप, द्वितीय क्रमांक देवेंद्र वसंत चव्हाण याने तर तृतीय क्रमांक सोनल एकनाथ मांडवकर हिने मिळवला. तसेच सेमिनार स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक कपिल विनय निळे, द्वितीय क्रमांक अकिब रजा मोहम्मद अबिद याने तर तृतीय क्रमांक वैष्णवी सुरेश मोरे व समीक्षा राजेश दुधे ह्यांनी मिळवला. गणितीय रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक वैष्णवी गोवर्धन मोहोड, द्वितीय क्रमांक रिया शैलेंद्र ठाकरे हिने तर तृतीय क्रमांक भाग्यश्री हरिदास बदरखे हिने मिळवला.

कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी अध्यक्षपदी प्रा. एस. एस. शेरेकर होते. प्रमुख पाहुणे डॉ. एस. एन. बायस्कर, एम. सी. धाबे उपस्थित होते. यावेळी पाहुण्यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्या विध्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता डॉ. एम. एस. देसले, ए. आय. ढेठे, ए. पी. निळे, डी. पी. राठोड, के. पी. काळे, बी. डी. देशमुख, ए. एस. रौंदळे, शोएब अख्तर आदींचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे संचालन अश्विनी भगत व वैष्णवी गव्हाड यांनी केले.

हिंदुस्थान

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात डॉ. आंबेडकरांना काव्य अभिवादन



अमरावती दि. १४ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित समता सप्ताह समारोह - २०२३ अंतर्गत भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यासाठी प्रसिद्ध कवी प्राचार्य डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली एका कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. के. जी. देशमुख सभागृहात पार पडलेल्या या कविसंमेलनात अशोक थोरात, अशोक इंगळे, भास्कर पाटील, कैलास वानखेडे, प्रफुल्ल गवई, अजय खडसे, गजानन बन्सोड, अनिल काळबांडे, विलास भवरे, चरणदास सोळंके, चंद्र पाखरे, संजय शेजंव, विक्रांत मेश्राम, दिनेश राऊत, सुरेश चापोरकर, सुरेखा वणवे, सत्येंद्र गडपायले इत्यादी कवी सहभागी झाले होते. कविसंमेलनाचे सूत्रसंचालन रवि चापके यांनी केले.

प्रारंभी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बन्सोड यांनी उपस्थित सर्व कवींचे पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत केले. त्यानंतर जवळपास दोन तास चाललेल्या या कविसंमेलनात निमंत्रित कवींनी आपल्या वेगवेगळ्या आशयाच्या कविता सादर करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन केले. सरतेशेवटी, कविसंमेलनाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अशोक नामदेव पळवेकर यांनी फॅसिझमच्या विरोधात एल्गार पुकारणारी 'डरो मत!' ही त्यांची अत्यंत गाजलेली कविता सादर केली. या कवितेच्या सादरीकरणानंतर कविसंमेलनाचा समारोप झाला.

या कविसंमेलनाला डॉ. भी. र. वाघमारे, डॉ. तुषार देशमुख, डॉ. प्रवीण रघुवंशी, डॉ. नितीन कोळी यांच्यासह शहरातील इतर अनेक लोक उपस्थित होते.

विद्यावार्ता

**नवराष्ट्र**

# भारतीय राज्यघटना जीवंत करार !



## डॉ. वेदप्रकाश मिश्रा : समता सप्ताहनिमित्त व्याख्यान

अमरावती, ब्युरो. भारतीय राज्यघटना चेतना आहे, अस्मिता आहे. ते एक जीवंत दस्तावेज असून भारतीयांसाठी जीवंत करार असल्याचे प्रतिपादन नागपूर येथील सुप्रसिध्द वक्ते डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी केले. विद्यापीठाच्या डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राच्यावतीने समता सप्ताहाच्या निमित्ताने विशेष व्याख्यानाचे आयोजन त्यांनी येथे सहभाग घेतला.

त्याप्रसंगी 'भारतीय राज्यघटना : एक जीवंत गतिमान करार' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, प्राचार्य डॉ. वर्षा देशमुख, डॉ. आंबेडकर अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. संतोष बनसोड उपस्थित होते.

डॉ. मिश्रा विषयाची मांडणी करताना म्हणाले, भारतीय राज्यघटनेत स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, प्रतिष्ठा, आत्मसन्मान, नागरिकत्व ही मूल्ये दिलेली आहेत. नागरिकांना केवळ एक मत एक मूल्य न देता राजकीय, सामाजिक व आर्थिक समानता असावी यावर बाबासाहेबांनी भर दिला. त्यांनी जनतेला दिलेले अधिकार दानाच्या स्वरुपात नाही, तर मूलभूत स्वरुपात दिले. घटनेने नागरिकांना दिलेल्या अधिकाराचा वापर नागरिक करीत आहे. खऱ्या अर्थाने लोकशाहीची ती श्रीमंती आहे.

**विदर्भ मतदार**



## विद्यापीठात महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

अमरावती (विदर्भ मतदार प्रतिनिधी) : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेला हारार्पण व पूजन करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील तसेच विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

अमरावती इव्हिनिंग २९ एप्रिल, २०२३.

## निरोगी आरोग्यासाठी फिजिओथेरपी उपयुक्त - डॉ. मृणाल वाघमारे


विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षकांची फिजिओ क्लिनिकला भेट



**प्रतिदिन अखबार**

अमरावती, रविवार, 23 अप्रैल 2023

## संगाबा विवि में मनाई महात्मा बसवेश्वर जयंती




अमरावती - संगाबा अमरावती विवि में महात्मा बसवेश्वर की जयंती मनाई गई. इस समय कुलसचिव डॉ. तुषार देशमुख ने महात्मा बसवेश्वर की प्रतिमा का पूजन, माल्यार्पण कर विवि की ओर से अभिवादन किया. कार्यक्रम में आजीवन अध्ययन व विस्तार विभाग के संचालक डॉ. श्रीकांत पाटिल तथा विवि के अधिकारी व कर्मचारी उपस्थित थे.

विद्यावार्ता

विदर्भ मतदार

# विद्यापीठात दंत तपासणी शिबीर




अमरावती (विदर्भ मतदार प्रतिनिधी): संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व दंत महाविद्यालय-रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने दंत तपासणी शिबिराचे पदव्युत्तर शिक्षण विभागात आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. गजानन गुल्हाने होते. अधिष्ठाता व दंत शल्य चिकित्सक डॉ. राजेश गोंधळेकर, विद्यापीठाच्या आरोग्य अधिकारी

## ४० जणांनी घेतला लाभ

डॉ. स्मिता थोरात, डॉ. योगेश तसेच दंत महाविद्यालय-रुग्णालयाची चमू यांनी शिबिराला मार्गदर्शन केले. दातांच्या समस्या, निगा कशी राखावी याविषयी डॉ. गोंधळेकर यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. गजानन गुल्हाने यांनी दातांच्या आरोग्याचे महत्त्व, व्यसनापासून मुक्त राहावे, असा सल्ला दिला. दंत महाविद्यालयाच्या तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांची दंत तपासणी करून दाताच्या आरोग्याबाबत मोलाचा सल्ला दिला. शिबिरात ४० जणांनी दंत तपासणी करून घेतली. शिबिराला पदव्युत्तर शिक्षण विभागातील सर्व प्राध्यापकवृंद, प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

TheHitavada

# National Mathematics Day celebrated at SGBAU

■ Amravati Bureau
AMRAVATI, Apr 26

UNIVERSITY level poster, seminar and mathematical Rangoli competition was organised at Post Graduate Department of Mathematic from Sant Gadgebaba Amravati University recently to mark the National Mathematics Day recently.

Dr P A Wadegaonkar, Pro-Vice-Chancellor of Sant Gadgebaba Amravati University presided over the inaugural programme. While Prof K S Adhav, former Head of Department of Mathematics, Sant Gadgebaba Amravati University Amravati and Prof V B Raut, Principal Mungsaji Maharaj College, Darwha, and Prof S S Sherekar Head of Mathematics Department were present as the chief guests.

The programme was started with the university song and by worshiping the image of Sant Gadgebaba and offering flowers to it. Also the guests were welcomed with flowers. Prof S S Sherekar delivered the introductory remarks. While guiding the students on this occasion Prof K S Adhav spoke about the contribution of great mathematician Srinivasa Ramanujan to mathematics. Prof V B Raut spoke about the important place of mathematics in the society and also gave an important advice that dedication is very important while studying mathematics. Dr P A Wadegaonkar also guided the students and highlighted the importance of research in mathematics and the place of mathematics in other subjects.


Guests inaugurating the competition.

After the inauguration programme, the guests examined the poster, seminar and *rangoli*. On this occasion, Dr P R Agrawal, H G Parlikar, M C Dhabe worked as the examiner for the competition. Achal Sharad Jagtap secured first place in the poster competition. While Devendra Vasant Chavan secured second and Sonal Eknath Mandavkar bagged the third prize in the competition. Also, in the seminar competition, Kapil Vinay Neele got first place, while Aqib Raza Mohammad Abid got second place and Vaishnavi Suresh More and Samiksha Rajesh Dudhe remained on third place. While in Mathematical Rangoli competition, Vaishnavi Govardhan Mohod clinched first place, while Riya Shailendra Thakare remained on second and Bhagyashree Haridas Badarkhe remained satisfied on third place.

Prof S S Sherekar Department of Mathematics, Sant Gadgebaba Amravati University presided over the valedictory function of the programme. While Dr S N Baiskar, Adarsh College, Dhamangaon Railway, M C Dhabe were present as the chief guests. On this occasion, the winners of the competition were felicitated by dignitaries.

Dr M S Desale, A I Dethe, A P Nile, D P Rathod, K P Kale, B D Deshmukh, A S Raundale, Shoaib Akhtar and all the teaching staff and head of department have rendered valuable guidance for the success of the programme. The programme was moderated by Ashwini Bhagat and Vaishnavi Gawhad.

विद्यावार्ता

हिंदुस्थान

मराठी दैनिक
वृत्त केसरी

विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात व्याख्यान

# पंचमहाभुतांचे संतुलन आपल्या हातात

डॉ. भारतभूषण शर्मा यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी / वृत्तकेसरी

अमरावती, २१ एप्रिल - पंचमहाभूते सर्वांना परिचित आहेत. आयुर्वेद, निसर्गोपचार व इतर चिकित्सा पद्धतीमध्ये पंचमहाभूतांचे महत्व आहे. या पंचमहाभूतांमध्ये असंतुलन झाल्यास शारीरिक व्याधी निर्माण होतात. पंचमहाभूतांना संतुलित ठेवणे शरीर स्वास्थ्याकरीता फार महत्त्वाचे आहे. त्यासाठी आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन व्याख्याते डॉ. भारतभूषण शर्मा यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन विस्तार विभागातील पदव्युत्तर पदविका योग, थेरपी व पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार आणि योगशास्त्र अभ्यासक्रमाच्यावतीने द्विदिवसीय अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. श्रीकांत पाटील, प्रमुख अतिथी म्हणून हरियाणा येथील डॉ. भारतभूषण शर्मा, डॉ. अनिल चौधरी यांची उपस्थिती होती. याप्रसंगी डॉ. शर्मा यांनी मुद्राथेरपी, कर्ण ॲक्युप्रेशर, नाभीचिकित्सा अशा अनेक विषयांवर सोप्या पद्धतीने मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय भाषणात संचालक डॉ. श्रीकांत पाटील म्हणाले, चिकित्सा पद्धत दैनंदिन जीवनात अगदी सहजच आपण करू शकतो. नवनवीन चिकित्सा पद्धती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात,



विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवू नये, तर वेगवेगळे कौशल्य, ज्ञान व अनुभव घेतले पाहिजे, त्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून या माध्यमातून एक सक्षम रोजगाराभिमुख विद्यार्थी घडविण्याचा प्रयत्न केला जातो. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने करण्यात आली. अतिथींचे स्मृतिचिन्ह देऊन डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्वागत केले. संचालन प्रयोगनिसताने, तर आभार स्नेहा माकोडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता डॉ. अश्विनी राऊत, प्रा. आदित्य पुंड, प्रा. राहुल देडके, प्रा. संदीप महल्ले यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला सर्व अभ्यासक्रमाचे समन्वयक, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिलेल्या सेवेच्या कर्तव्यपूर्तीचा मोठा आनंद असतो : कुलसचिव डॉ. तुषार देशमुख

## कर्तव्यपूर्ती सोहळ्यात विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान



अमरावती दि. ३० : सेवानिवृत्त होत असतांना कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सेवेच्या कर्तव्यपूर्तीचा त्यांना मोठा आनंद असतो व विद्यापीठालाही त्यांचा अभिमान आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. शनिवारी दि. २९ एप्रिल, २०२३ रोजी विद्यापीठातील वित्त विभागातील कर्मचारी श्री आर.डी. हटवार व आय.क्यू.ए.सी. विभागातील श्री आर.डी. कोकाटे यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य डॉ. वैशाली गुडधे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. नितीन कोळी, आय.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे, सत्कारमूर्ती श्री राजेंद्र हटवार, श्री राजाराम कोकाटे यांची उपस्थिती होती.

कुलसचिव डॉ. तुषार देशमुख पुढे म्हणाले, विद्यापीठातील कर्मचारी सेवानिवृत्त होत असतांना दुसरीकडे मनुष्यबळाची पोकळी देखील निर्माण होत आहे. ही पोकळी भरुन काढण्यासाठी प्रशासनाकडून शासनाकडे पाठपुरावा सुध्दा केला जात आहे. ७२ जागांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून, त्यातील पन्नास टक्के जागा जरी शासनाने मंजूर केल्यात, तर विद्यापीठातील सेवा सुरळीत होईल. सत्कारमूर्तींची कामाप्रती नेहमीच तळमळ राहिलेली आहे व विद्यापीठाला सुध्दा त्यांचा अभिमान आहे, असे सांगून श्री हटवार व श्री कोकाटे यांना त्यांनी पुढील आयुष्याच्या शुभकामना दिल्या.

सत्कारमूर्ती श्री राजेंद्र हटवार मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, तीस वर्षे दोन महिने विद्यापीठाला सेवा दिली. संगणकीय प्रणाली सुरू झाल्यावर कामे अगदी वेगाने पार पाडली गेली. एका ऑस्ट्रेलियन व्यक्तीने डॉलरने शुल्काचा भरणा केला होता, तो प्रसंग सांगतांना बँकेत जेव्हा डॉलर जमा करावयास गेलो तेव्हा बँकेने परकिय चलन घेण्यास नकार दिल्याने अडचण निर्माण झाली होती. मग त्यातून बँकेने मार्ग सुचवला व नागपूर येथे जावून भारतीय स्टेट बँकेत डॉलर जमा करुन नंतर ते भारतीय चलनात परिवर्तीत केले असे श्री हटवार यांनी सांगितले. श्री राजाराम कोकाटे मनोगत व्यक्त करतांना म्हणाले, प्रदिर्घ सेवा झालेली आहे व यादरम्यान आपल्याला सर्वांनी नेहमीच सहकार्य केले त्यांचा मी आभारी आहे. प्रमुख अतिथी डॉ. वैशाली गुडधे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. नितीन कोळी, आ.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

सत्कारमूर्ती श्री राजेंद्र हटवार व श्री राजाराम कोकाटे यांचा कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला. तर सौ. हटवार व सौ. कोकाटे यांचा सौ. प्रज्ञा बोंडे यांचा साडीचोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. तसेच विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश वरखेडे व सचिव श्री श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्ती श्री हटवार व श्री कोकाटे यांना कर्मचारी कल्याण निधीचा धनादेश देऊन सत्कार केला.

# विद्यापीठ में राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज जयंती मनाई



कार्यालय प्रतिनिधि| अमरावती. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज की जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ में मनाई गई। इस समय कुलसचिव डॉ. तुषार देशमुख ने राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज की प्रतिमा का पूजन किया। कार्यक्रम में विद्यापीठ के अधिकारी व कर्मचारी उपस्थित थे।

जनमाध्यम

# निरोगी आरोग्यासाठी फिजिओथेरपी उपयुक्त-डॉ. मृणाल वाघमारे

## विद्यापीठातील विद्यार्थी, शिक्षकांची फिजिओ क्लिनिकला भेट



**अमरावती/का.प्र.**

धावपळीच्या काळात मनुष्य यंत्रावत काम करू लागला आहे. त्याचे अनेक दुष्परिणाम आरोग्यावर होत आहे आणि अशा वेळी अनेक प्रकारचे उपचारही केले जातात. मात्र फिजिओथेरपी ही आधुनिक उपचार पद्धती अशावेळी फायदेशीर आहे, असे मत स्थानिक राजकमल चौक स्थित फिजिओथेरपी क्लिनिकच्या न्युरोतज्ज्ञ डॉ. मृणाल वाघमारे यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदव्युत्तर पदविका योगथेरपी, पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार व योगशास्त्र अभ्यासक्रमांतर्गत शिक्षक, विद्यार्थ्यांनी क्लिनिकला भेट दिली. त्यावेळी त्यांनी प्रस्तुत विचार व्यक्त केले. डॉ.मृणाल वाघमारे यांनी यावेळी फिजिओथेरेपीमधील चिकित्सा प्रणालीची माहिती दिली.

फ्रॅक्चरसंबंधी विकार, शस्त्रक्रियेनंतरचे व्यायाम, स्नायुचे दुखणे पॅरॉलिसिस, पोलिओ, पाठ दुखी, मणक्यांचे विकार, संधीवात, पार्किनसोनीझम, सेरेब्रल पाल्सी, चेह-याचा पॅरॉलिसिस आदी आजारांवर फिजिओथेरपी कशी लाभकारक ठरते, याविषयी डॉ. मृणाल वाघमारे यांनी माहिती दिली. या चिकित्सा पध्दतीचा विद्यार्थ्यांनी समाजाला कसा लाभ घेता येईल व आपला स्वंयरोजगार उभारण्यासाठी त्याचा उपयोग करावा असे आवाहन याप्रसंगी डॉ. वाघमारे यांनी केले.

यावेळी समन्वयिका डॉ. अश्विनी राऊत, समन्वयक प्रा. आदित्य पुंड यांनी डॉ. मृणाल वाघमारे यांचे पुस्तक देऊन आभार मानले. प्रा.राहुल दोडके, प्रा.संदीप महल्ले तसेच विद्यार्थ्यांचा यावेळी सहभाग होता.

# विवि में राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

अमरावती, 30 अप्रैल - संगाबा अमरावती विवि में 30 अप्रैल को राष्ट्रसंत तुकडोजी महाराज की जयंती मनाई गई. इस दौरान कुलसचिव डॉ. तुषार देशमुख ने तुकडोजी महाराज की प्रतिमा का पूजन, माल्यार्पण कर विवि की ओर से अभिवादन किया. इस कार्यक्रम में विवि के अधिकारी व कर्मचारी उपस्थित थे.



पुण्य नगरी

# अमरावती विद्यापीठात सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

पुण्य नगरी / प्रतिनिधी



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील वित्त विभागातील कर्मचारी आर. डी. हटवार व आयक्यूएसी विभागातील आर. डी. कोकाटे यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी शनिवार, २९ एप्रिल रोजी कर्तव्यपूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. तुषार देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. वैशाली गुडधे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. नितीन कोळी, आयक्यूएसी विभागाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे, सत्कारमूर्ती आर. डी. हटवार, आर. डी. कोकाटे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी आर. डी. हटवार व आर. डी. कोकाटे यांचा कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला. तसेच त्यांच्या पत्नींचा प्रज्ञा बोंडे यांनी साडीचोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष मंगेश वरखेडे व सचिव श्रीकांत तायडे यांनी हटवार व कोकाटे यांना कर्मचारी कल्याण निधीचा धनादेश देऊन सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर यांनी केले.


देशोन्नती

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला आज ४० वर्षे पूर्ण!

देशोन्नती वृत्तसंकलन...

**अमरावती** ▪ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाली स्थापन होऊन आज सोमवार १ मेरोजी चाळीस वर्ष पूर्ण होत आहे. पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा त्यानंतर कालांतराने अकोला जिल्ह्याचे विभाजन होऊन वाशिम जिल्ह्याची निर्मिती झाली व अमरावती विद्यापीठाचे परिक्षेत्र पाच जिल्ह्यांचे झाले. या जिल्ह्याकरिता १ मे १९८३ रोजी अमरावती येथे विद्यापीठाची स्थापना महाराष्ट्र शासनाने केली. तत्कालीन विदर्भ महाविद्यालयामध्ये हे विद्यापीठ सुरु झाले.

तपोवन शेजारी ४७० एकराच्या मध्य परिसरात विद्यापीठरुपी वटवृक्ष डौलदारपणे उभा असून, राष्ट्रातील इतर अकृषी विद्यापीठांचा विचार करता अमरावती विद्यापीठाने केलेली प्रगती खरोखरच वाखाणण्याजोगी आहे. विद्यापीठाच्या ज्ञानदानाला ४० वर्षे पूर्ण होत आहे. चाळीस वर्षांपूर्वी लावलेल्या छोट्याशा रोपट्याची आज वटवृक्षाकडे प्रगतशील वाटचाल सुरु आहे. अमरावतीला विद्यापीठ व्हावे, यासाठी पहिला प्रशासकीय ठराव ७ ऑगस्ट, १९६४ ला विधानसभेत मांडल्या गेला. तेव्हापासून चळवळ सुरु झाली. सतत २० वर्षे अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीचा प्रयत्न या भागातील जनप्रतिनिधींनी पोटतिडकीने सांसदीय आयुधांचा वापर करुन विधीमंडळात लावून धरला. त्या सर्वांच्या भगिरथ प्रयत्नांचा परिपाक म्हणजे अमरावती विद्यापीठाची निर्मिती. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या



अध्यक्षतेखाली तत्कालीन शिक्षणमंत्री सुधाकर नाईक, राज्यपाल आय.एच. लतीफ, आणि प्रतिभाताई पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विदर्भ महाविद्यालयाच्या प्रांगणात विद्यापीठ स्थापनेचा कार्यक्रम पार पडला. महाराष्ट्र शासनाने अमरावती विद्यापीठ स्थापनेबाबतचा अध्यादेश २९ एप्रिल, १९८३ रोजी निर्गमित केला होता.

### विद्यापीठात घेतात जवळपास ५ लक्ष विद्यार्थी शिक्षण

विद्यापीठाची स्थापना झाली, त्यावेळी संलग्न महाविद्यालयांची संख्या ६७ होती. विद्यार्थीसंख्या जवळपास २७ हजार व परीक्षांची संख्या ४९ होती. २३ नोव्हेंबर, १९९० रोजी विद्यापीठाला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता मिळाली. चाळीस वर्षाच्या कालावधीत विद्यापीठाच्या कार्याचा आलेख प्रचंड विस्तारलेला आहे. आता विद्यापीठ परिसरात ३४ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग सध्या कार्यरत असून जवळपास २५०० चे वर विद्यार्थी परिसरात शिक्षण घेत आहेत. बुलढाणा येथे मॉडेल डिग्री कॉलेज आहे. पाचही जिल्ह्यांत ४०४ महाविद्यालये या विद्यापीठाशी संलग्नित आहेत. जवळपास ५ लक्ष विद्यार्थी या विद्यापीठात शिक्षण घेत असून जवळपास ७०० परीक्षांचे संचालन विद्यापीठ करीत आहेत.

अमरावती विद्यापीठाच्या निर्मितीनंतर विद्यापीठाच्या विकासासाठी व या भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विद्यापीठातर्फे मागील चाळीस वर्षांत अनेक योजना, उपक्रम, प्रकल्प, परिसर विकास, शिक्षण, संशोधन, अध्यापनाचे कार्य आठ कुलगुरुंच्या नेतृत्वात यशस्वीपणे राबविण्यात आले. विद्यापीठाने आज चाळीस वर्षे पूर्ण केलीत. दहा वर्षानंतर हे विद्यापीठ आपल्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करेल.

विद्यावार्ता

नवराष्ट्र | 3 मे 2023

डॉ. तुषार देशमुख : सत्कार सोहळा

# दिलेल्या सेवेच्या कर्तव्यपूर्तीचा आनंद



अमरावती, ब्यूरो. सेवानिवृत्त होत असताना कर्मचा-यांनी दिलेल्या सेवेच्या कर्तव्यपूर्तीचा त्यांना मोठा आनंद असतो व विद्यापीठालाही त्यांचा अभिमान आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. शनिवारी विद्यापीठातील वित्त विभागातील कर्मचारी आर.डी. हटवार व आय.क्यू.ए.सी. विभागातील आर.डी. कोकाटे यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी आयोजित कर्तव्यपूर्ती सोहळ्यात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य डॉ. वैशाली गुडधे, वित्त व लेखा अधिकारी डॉ. नितीन कोळी, आय.क्यू.ए.सी. विभागाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे, सत्कारमूर्ती राजेंद्र हटवार, राजाराम कोकाटे यांची उपस्थिती होती.

सत्कारमूर्ती राजेंद्र हटवार व राजाराम कोकाटे यांचा कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी शाल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र, स्मृतीचिन्ह देऊन सत्कार केला, तर श्रीमती हटवार व श्रीमती कोकाटे यांना प्रज्ञा बोंडे यांचा साडीचोळी व कुंकवाचा करंडा देऊन सत्कार केला. तसेच विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेचे अध्यक्ष मंगेश वरखेडे व सचिव श्रीकांत तायडे यांनी सत्कारमूर्ती हटवार व कोकाटे यांना कर्मचारी कल्याण निधीचा धनादेश देऊन सत्कार केला.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत, विद्यापीठ गीताने व मान्यवरांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन व आभारन विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी तसेच सत्कारमूर्तीच्या कुटुंबियांतील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुष्परीणाम नसल्याने विना औषधी उपचार चिकित्सा पद्धतींचा प्रसार

निसर्गोपचार, योगशास्त्र व्याख्यानमालेत डॉ. अनिल चौधरी



अमरावती दि. २ :- आरोग्याची मोठी समस्या आज समाजापुढे उभी आहे, दिवसेंदिवस यामध्ये वाढ होत आहे. त्याचे कारण वायूप्रदुषण, जलप्रदुषण, दुषित आहार इत्यादींचा प्रभाव शरीरावर पडतो, त्यामुळे अनेक प्रकारच्या व्याधीला सामोरे जावे लागत आहे व यातून वाचण्याकरिता विना औषधी उपचार असून वैकल्पिक चिकित्सा पद्धतीमध्ये विना औषधी उपचार केल्या जातात व त्याचे कोणतेही दुष्परिणाम नाहीत, तसेच ही पध्दत कमी खर्चिक असल्यामुळे या चिकित्सा पद्धतींचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणात होत आहे, असे प्रतिपादन डॉ. अनिल चौधरी यांनी केले.

ते संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या पदव्युत्तर पदविका निसर्गोपचार आणि योगशास्त्र, पदव्युत्तर पदविका योगथेरपी अभ्यासक्रमाच्या वतीने आयोजित अतिथी व्याख्यानात बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रमुख अतिथी म्हणून व्याख्याते डॉ. अनिल चौधरी, डॉ. भरत भूषण शर्मा उपस्थित होते.

डॉ. श्रीकांत पाटील यांनी अध्यक्षीय भाषणातून विना औषधोपचार पद्धतींचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले व अशा कौशल्यावर आधारित उपक्रमांमध्ये सहभागी होऊन आपला कौशल्य विकास करुन स्वयंरोजगार निर्माण करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीत व विद्यापीठ गीताने करण्यात आली. अतिथींचे डॉ. श्रीकांत पाटील यांनी स्मृतीचिन्ह देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे संचालन श्री प्रयोग निस्ताने, तर आभार सौ. नेहा माकोडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता समन्वयक प्रा. आदित्य पुंड, डॉ. अश्विनी राऊत, प्रा. राहुल दोडके, प्रा. संदीप महल्ले, विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला सर्व अभ्यासक्रमांचे समन्वयक, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# Tukadoji Maharaj's birth anniv celebrated with fanfare, zeal



Dr Tushar Deshmukh and others offering obeisance to Rashtrasant Tukdoji Maharaj.

ments at Amravati Municipal Corporation were prominently present for the programme. All the present officers and staffers also offered floral obeisance to Rashtrasant Tukadoji Maharaj on the occasion.

Dr Tushar Deshmukh and others offering obeisance to Rashtrasant Tukdoji Maharaj.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## मार्गदर्शक



**श्री. रमेश बैस**

मा. राज्यपाल तथा कुलपती


संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**प्रा. (डॉ.) प्रमोद येवले**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**प्रा. (डॉ.) प्रसाद वाडेगांवकर**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## प्रकाशक



**डॉ. तुषार देशमुख**

मा. कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**

डॉ. विलास नांदुरकर

जनसंपर्क अधिकारी

**सह - संपादक**

श्री. ओम जगताप

जनसंपर्क विभाग